
आनंदी राजपुत्र

ऑस्कर वाइल्ड, जेन रे



आनंदी राजपुत्र

ऑस्कर वाइल्ड,   जेन रे



मराठी : शोभा भागवत







त्या शहरात कुठूनही दिसेल अशा जागी एक पुतळा होता. खास बांधलेल्या एका उंच, रुंद, कोरीव स्तंभावर आनंदी राजपुत्राचा पुतळा होता. तो सबंध पुतळा अस्सल सोन्याच्या तलम पानांनी सजवला होता. त्याच्या डोळ्यांच्या जागी दोन तेजस्वी नीलरत्नं होती. त्याच्या तलवारीच्या मुठीवर मोठं लाल रत्न उठून दिसत होतं.






एका रात्री त्या शहरात एक छोटी पाकोळी उडत उडत आली. तिनी उंच स्तंभावरचा तो पुतळा पाहिला आणि ती त्या पुतळ्याच्या सोनेरी पावलांजवळ अलगद उतरली.

“वा !” आज मला निजायला सोन्याची खोली आहे ! ती तिच्या पंखात डोकं लपवणार एवढ्यात पाण्याचा एक मोठा थेंब तिच्या अंगावर पडला.





त्या आनंदी राजपुत्राचे डोळे अश्रूंनी डबडबले होते. त्याच्या सोनेरी गालांवरून ओघळून ते खाली येत होते. चंद्राच्या प्रकाशात त्या राजपुत्राचा चेहरा इतका सुंदर दिसत होता की, त्या छोट्या पाकोळीचं मन करूणेनं भरून आलं.



"तू कोण आहेस?'' पाकोळीनं विचारलं.
"मी आनंदी राजपुत्र आहे.''
"मग तू रडतो आहेस का?'' पाकोळीनं विचारलं.
"तू मला भिजवून टाकलंस बघ.''
"मी जेव्हा जिवंत होतो आणि माझं हृदय माणसासारखं होतं.'' पुतळ्यानं उत्तर दिलं. "मला अश्रू म्हणजे काय ते माहीतच नव्हतं. म्हणून माझ्या दरबारातले लोक मला आनंदी राजपुत्र म्हणायचे. आता माझ्या मृत्यूनंतर त्यांनी मला इथे इतक्या उंचावर उभं केलं आहे की इथून मला माझ्या शहरातलं सगळं दुःख दिसत आहे. आता जरी माझं हृदय धातूचं आहे तरी रडण्याखेरीज त्याला काही मार्गच नाही.''





"लांबवर पुतळा बोलतच राहिला.'' मला एक गरीब घर दिसत आहे. तिथे एक लहान मुलगा आजारी आहे. तो पलंगावर निजला आहे. तो संत्र खायला मागतो आहे. त्याची आई त्याला काहीच देऊ शकत नाही. तिच्या घरात पिण्यासाठी फक्त नदीचं पाणी आहे. म्हणून तो मुलगा रडतो आहे. अगं चिमुकल्या पाकोळी तू माझ्या या तलवारीच्या मुठीतलं हे मोठं लाल रत्न काढून घेऊन त्या आईला देऊन येशील का?



"माझे मित्र इजिप्तमध्ये माझी वाट पहात आहेत.'' पाकोळी म्हणाली. माझे मित्र आता नाइल नदीवरून उडत चालले आहेत आणि ते नदीतल्या कमळांशी गप्पा मारत आहेत. लवकरच ते थोरल्या राजाच्या विश्रांती स्थळावर निजायला जातील. राजा स्वत: तिथे स्वत:च्या नक्षीदार, रंगवलेल्या शवपेटीत चिरनिद्रा घेत आहे. त्याच्या गळ्यात फिकट हिरव्या रंगाच्या रत्नांची माळ आहे. त्याचे हात सुकलेल्या हातांसारखे दिसतात.

"अगं पाकोळी पाकोळी चिमुकल्या पाकोळी.'' राजपुत्र म्हणाला, "तू माझ्यासाठी एक रात्र नाही का इथे थांबणार? आणि माझी दूत नाही का होणार?''






आनंदी राजपुत्र इतका दु:खी दिसत होता की छोट्या पाकोळींनी राजपुत्राच्या तलवारीतलं मोठं लाल रत्न चोचीनी काढून घेतलं आणि ते तिच्या इवल्याशा चोचीत धरून ती शहराच्या इमारतींच्या छतांवरून उडत गेली.

ती त्या शहरातल्या मोठ्या चर्चच्या मनोऱ्यावरून उडत गेली तेव्हा तिला तिथे शुभ्र पांढरे संगमरवरी देवदूत कोरलेले दिसले. ती नदीवरून जाताना थबकली आणि तिला जहाजावरच्या काठ्यांवर टांगलेले कंदील दिसले.

शेवटी ती त्या गरीब घराजवळ पोचली. त्या घरात तो छोटा आजारी मुलगा झोपी गेला होता. तिनी त्या घरातल्या टेबलावर ते लाल रत्न टाकलं.

नंतर ती उडत उडत आनंदी राजपुत्राकडे परत आली. तिनी काय काय केलं ते त्याला सांगितलं. ती म्हणाली, “नवलच आहे हे! मला चक्क उबदार वाटतंय आणि सगळीकडे तर इतकी थंडी आहे !’’





दुसऱ्या दिवशी जेव्हा रात्री चंद्र उगवला तेव्हा पाकोळीनी राजपुत्राकडे पाहिलं आणि म्हणाली, “मी आता इजिप्तला निघालेच आहे.’’ राजपुत्रानं तिला पुन्हा विनवणी केली, “पाकोळी पाकोळी, चिमुकल्या पाकोळी माझ्यासाठी आणखी एक रात्र नाही का गं थांबणार तू?’’

ती म्हणाली, “इजिप्तमध्ये माझे सोबती माझी वाट पहात आहेत. तिथे उंची गुळगुळीत दगडांनी बनवलेल्या सिंहासनावर मेमनॉन नावाचा राजा बसला आहे. तो रात्रभर तारे पहात असतो आणि जेव्हा पहाटेचा तारा उगवतो तेव्हा तो आनंदानी एक किंकाळी फोडतो आणि त्यानंतर सगळीकडे शांतता पसरते. दुपारी पिवळे सिंह पाणी पिण्यासाठी पाणवठ्याच्या काठी उतरतात.’’





“अगं माझ्या आवडत्या चिमुकल्या पाकोळी, ह्या शहराच्या दुसऱ्या बाजूला लांबवर एका घरावरच्या छोट्या खोलीत मला एक तरुण मुलगा दिसतो आहे. तो एका नाट्य दिग्दर्शकासाठी एक नाटक लिहितो आहे. ते त्याला लिहून पूर्ण करायचे आहे. पण खोलीत इतकी थंडी वाजते आहे की, त्याला यापुढे काही लिहिणं शक्यच नाही.’’

“मी आणखी एक रात्र तुझ्यासाठी थांबते. पाकोळी म्हणाली. कारण ती खरोखरच प्रेमळ होती. मी आणखी एक लाल रत्न घेऊन त्याला देऊन येऊ का?’’

“काय करू? आता माझ्याकडे दुसरं लाल रत्न नाही आहे गं?’’ राजपुत्र म्हणाला, “आता माझे डोळेच उरलेत माझ्याकडे. माझ्या डोळ्यातली नीलरत्नं खास भारतातून आणलेली दुर्मिळ नीलरत्नं आहेत. त्यातलं एक काढून घे आणि त्याला नेऊन दे.’’

“अरे माझ्या लाडक्या राजपुत्रा, तेवढं मात्र मला सांगू नकोस रे.’’ आणि ती कळवळून रडू लागली.





“पाकोळी पाकोळी, चिमुकल्या पाकोळी.’’ राजपुत्र म्हणाला, “ही माझी आज्ञा आहे. मी सांगतो तसं कर.’’

मग पाकोळीनं राजपुत्राचा एक डोळा काढला आणि तो तरुण विद्यार्थ्याला द्यायला ती त्याच्या खोलीकडे निघाली आणि जेव्हा त्या विद्यार्थ्यांनी वर पाहिलं तेव्हा त्याला त्याच्या लिहायच्या टेबलावर ते नीलरत्न दिसलं.




आता मला तुझा निरोप घेतलाच पाहिजे. दुसऱ्या रात्री जेव्हा चंद्र उगवला तेव्हा पाकोळी रडतच म्हणाली, “मी चालले आता इजिप्तला.’’

“पाकोळी पाकोळी इवल्याशा पाकोळी’’ राजपुत्र म्हणाला “एवढी एकचं रात्र गं! तू नाही का थांबणार माझ्यासाठी?’’

“हा हिवाळा आहे, पाकोळीनं उत्तर दिलं.’’ लवकरच इथे हिमवर्षाव सुरू होईल. इजिप्तमध्ये मात्र हवा उबदार असेल. पामच्या झाडांवर बसून सूर्याच्या उन्हात ऊब घेता येईल. मगरी चिखलात लोळत आळसानी आजूबाजूला बघत असतील. माझ्या लाडक्या राजपुत्रा, मला तुला सोडून जावंच लागेल. पण माझ्या पुढच्या भेटीत मी तुझ्यासाठी दोन सुंदर नीलरत्नं आणीन. तू ती देऊन टाकलीस त्यांच्या जागी तुझ्या डोळ्यात बसवायला.’’







“खालच्याच चौकात काडेपेट्या विकणारी लहानशी मुलगी उभी आहे. तिच्या हातून तिच्या सगळ्या काडेपेट्या गटारात पडल्यात. तिच्या पायात बुट नाहीत, मोजे नाहीत आणि तिच्या डोक्यावर टोपीही नाही. तू माझा दुसरा डोळा काढ आणि तिला देऊन ये.’’

“मी तुझ्याबरोबर एक रात्र थांबते.’’ पाकोळी म्हणाली. “पण मला तुझा दुसरा डोळा काढवणार नाही. दोन्ही डोळे गेले तर तुला काहीच दिसणार नाही रे!’’

“पाकोळी, पाकोळी चिमुकल्या पाकोळी ही माझी तुला आज्ञा आहे. मी सांगतो तसं कर.’’

मग पाकोळीनी राजपुत्राचा दुसरा डोळाही चोचीनी काढला. तो घेऊन ती तीरासारखी झपकन खाली गेली आणि पटकन् तिने काडेपेट्या विकणाऱ्या त्या छोट्या मुलीच्या हातावर हलकेच ठेवला.

त्यानंतर पाकोळीे राजपुत्राकडे परत आली. आता तुला काहीच दिसत नसेल रे ! पाकोळी काळजीने म्हणाली. “आता मी तुला सोडून कुठेही जाणार नाही. मी कायमचीच तुझ्याजवळ राहीन.’’





दुसऱ्या दिवशी पाकोळी दिवसभर राजपुत्राच्या खांद्यावर बसून होती आणि त्याला तिनी पाहिलेल्या अनेक चित्रविचित्र देशांमधल्या गूढ गोष्टी सांगत होती. तिने त्याला नाईल नदीकाठी लांबलचक ओळी करून उभ्या राहणाऱ्या या मोठ्या लाल पाणपक्ष्यांबद्दल सांगितलं. त्यांची चोच वाकडी आणि मान लांब असते. त्यांच्या चोचीनं ते सोनेरी मासे पकडतात. असं पण तिनं सांगितलं.



एका देशात मोठमोठे हिरवे साप असतात. ते मोठे वेटोळे करून पामच्या झाडावर झोपतात.



इजिप्तच्या वाळवंटात सिंहाचं मोठं शरीर आणि तोंड मात्र माणसाचं असा स्फिंक्स बसलेला आहे. त्याला म्हणे सगळं माहीत असतं. तो जग निर्माण झालं तेव्हापासून तिथे आहे असं म्हणतात.



चंद्राच्या पर्वतांचा एक राजा आहे. तो स्वत: शिसवीच्या लाकडासारखा काळाभोर आहे आणि तो एका स्फटिकाची पूजा करतो.



"माझ्या प्रिय चिमुकल्या पाकोळी गं" राजपुत्र म्हणाला, "तू मला खूप सुंदर गोष्टी सांगते आहेस. त्या गूढ आहेत. पण दुःखाइतकी मोठी गूढ गोष्ट नाही. माझ्या शहरावरून उडत जा आणि तुला काय काय दिसतं ते मला सांग."

मग पाकोळी त्या मोठ्या शहरावरून उडत गेली आणि तिला असं दिसलं की, श्रीमंत लोक त्यांच्या सुंदर घरामध्ये मजा करतायत आणि गरीब लोक, भिकारी त्यांच्या दरवाज्याजवळ बसले आहेत. मग ती उडत उडत राजपुत्राकडे गेली आणि तिनी जे पाहिलं ते त्याला सांगितलं.







"माझ्या अंगावर सगळीकडे सोन्याची पानं आहेत" राजपुत्र म्हणाला.
"तू ती सगळी पानं एकेक करून काढ आणि ती त्या गरीब भिकाऱ्यांना दे."

पाकोळीनं एकेक पान चोचीनं काढलं आता राजपुत्र अगदीच रया गेलेला आणि करड्या रंगाचा दिसू लागला. त्यानं एकेक पान गरीबांना वाटलं आणि त्यांच्या मुलांचे चेहरे आनंदले. त्यांना खूप हसू आलं. ती मुलं रस्त्यावर खेळायला लागली.





त्यानंतर हिमवर्षावाला सुरूवात झाली. हिमवर्षावानंतर बर्फ पडू लागले. सगळे लोक जाडे केसाळ कोट घालून हिंडू लागले. छोटी मुलं निळ्या टोप्या घालून बर्फावरून घसरण्याचे खेळ खेळू लागली.

बिचारी छोटी पाकोळी! ती थंडीनं गारठून गेली. पण तिनं राजपुत्राची साथ क्षणभरही सोडली नाही. राजपुत्रावर तिचं फार प्रेम होतं.

पण अखेरीस तिला कळून चुकलं होतं की, ती आता मरणार आहे. ती पुटपुटली, “माझ्या लाडक्या राजपुत्रा.....’’ तिची चोच हलकेच त्याच्या गालावर टेकवली आणि ती त्याच्या पायाशी मरून पडली.

आणि त्याच क्षणी राजपुत्राच्या पुतळ्याच्या आतमध्ये एकाएकी तडा गेल्याचा आवाज आला. पुतळ्याच्या आतलं धातुचं हृदय दोन तुकडे होऊन खाली पडलं. तेव्हा सगळीकडे भयानक बर्फ कोसळत होता.





दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर शहराचे महापौर त्यांच्या नगरसेवकांबरोबर त्या चौकात आले, “अरे बापरे! हॅपी प्रिन्स केवढा घाणेरडा दिसतोय, आणि त्याच्या पायापाशी पक्षी मरून पडला आहे.’’

इथे एक नोटीस लावा, “पक्ष्यांना इथे येऊन मरण्यास मनाई आहे.’’

मग कामगारांनी तो पुतळा तोडून खाली उतरवला आणि भट्टीत वितळवून टाकला. पण त्याचं तुटलेलं हृदय मात्र वितळेना. तेव्हा ते कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर टाकून दिलं. तिथेच त्या मृत पाकोळीलाही टाकलेलं होतं.







"मला या शहरातील दोन सर्वात मौल्यवान वस्तू आणा," देव त्याच्या एका देवदूताला म्हणाला. देवदूताने तुटलेले शिसे हृदय आणि मृत पक्षी आणले."तू योग्य निवड केली आहेस," देव देवदूताला म्हणाला, "माझ्या नंदनवनाच्या बागेत हा लहान पक्षी गाणार आहे आणि आनंदी राजकुमार तिथे कायमचा असेल."



समाप्त

1995 या वर्षी “केट ग्रीनले” या पुरस्कारासाठी ह्या पुस्तकाचं नाव सुचवलं गेलं होतं.

जेन रे यांची अप्रतिम चित्र आणि ती छापण्यासाठी वापरलेलं खास सोनेरी तंत्रज्ञान यांनी ह्या सर्वोत्तम अमर कलाकृतीला नवीनच सौंदर्य आणि जिवंतपणा प्राप्त झाला आहे.

ऑस्कर वाईल्ड यांची आनंदी राजपुत्राचा सोनेरी पुतळा आणि इजिप्तला जाता-जाता एका रात्री त्याच्या सोनेरी पायांशी उतरलेल्या छोट्या पाकोळीची गोष्ट गेली 100 वर्षे लहान-थोरांचे मनोरंजन करते आहे.

जेन रे सध्याच्या सर्वात प्रसिद्ध आणि लोकप्रिय आघाडीच्या चित्रकर्ती आहेत. त्यांच्या कामाला जगभरात प्रशंसा आणि प्रेम मिळालं आहे.

